**ठळक बातम्या**

- देशभरात सुरू असलेल्या जीएसटी बचत महोत्सवामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह असल्याचं प्रधानमंत्र्यांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन

- फलटणमध्ये विविध विकास कामांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन आणि लोकार्पण / डॉ. संपदा मुंडे यांच्या गुन्हेगारांना शिक्षा देण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- ज्येष्ठ अभिनेता सतीश शहा यांच्या पार्थिवावर मुंबईत अंत्यसंस्कार

- आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत-बांगलादेश सामन्यावर पावसाचं सावट

आणि

- राज्याच्या काही भागांत पावसामुळे पिकांना मोठा फटका, बहुतेक जिल्ह्यांमध्ये आज यलो अलर्ट

**<><><><><>**

देशभरात सध्या जीएसटी बचत महोत्सव सुरू असून यामुळे नागरिकांमध्ये खूप उत्साह आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून त्यांनी देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा १२७वा भाग होता. यंदाच्या सणासुदीच्या काळात स्वदेशी वस्तूंची खरेदी प्रचंड वाढली असल्याचं त्यांनी सांगितलं. कोणकोणती स्वदेशी उत्पादनं आपण खरेदी केली, याबद्दल नागरिकांनी संदेश पाठवून कळवल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

ऑपरेशन सिंदूरनं प्रत्येक भारतीयाला अभिमानानं भारून टाकलं आहे. कधीकाळी नक्षलवाद्यांच्या दहशतीखाली असलेल्या प्रदेशांमध्येही नक्षलवादाविरोधातल्या कारवाईमुळं यंदाच्या सणात आनंदाचे दीप प्रज्वलित झाले, असं सांगून, नक्षलवादाचं समूळ उच्चाटन करायच्या ध्येयाचा पुनरुच्चार त्यांनी केला.

प्रधानमंत्र्यांनी देशवासीयांनी छठच्या शुभेच्छा दिल्या. संस्कृती, निसर्ग आणि समाजातल्या एकतेचं प्रतीक असलेल्या या सणाच्या निमित्ताने समाजातला प्रत्येक घटक एकत्र येतो, हे भारताच्या सामाजिक एकतेचं सर्वात सुंदर उदाहरण असल्याचं ते म्हणाले.

संस्कृत भाषेचं महत्व आणि तिच्या संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी दिली. यासाठी युवा वर्ग करत असलेल्या प्रयत्नांमुळे आनंद वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाविषीच्या अभिनव उपक्रमांबद्दल प्रधानमंत्र्यांनी माहिती दिली. सागरी परिसंस्थेच्या जतन संवर्धनासाठी खारफुटीचं महत्व त्यांनी अधोरेखित केलं.

***होल्ड… MKB MANGROVE***

आपणही जिथं राहतो तिथं झाडं लावावीत, एक पेड़ माँ के नाम ही मोहीम आणखी पुढे न्यावी असं आवाहनही त्यांनी केलं.

येत्या ३१ ऑक्टोबरला लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंतीदिनाचं स्मरण करून, प्रधानमंत्र्यांनी पटेल यांच्या योगदानाला उजाळा दिला. यानिमित्त देशभरात आयोजित होणार असलेल्या 'रन फॉर युनिटी' मध्ये सहभागी व्हावं, असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या ७ नोव्हेंबर रोजी, वंदे मातरम्, या राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाला प्रारंभ होणार असल्याचं त्यांनी सांगितलं आणि या गीताचं महत्त्व विषद केलं. यानिमित्त देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं आणि यासाठी नागरिकांनी आपल्याला सूचना पाठवाव्यात असं आवाहनही केलं.

निजामाच्या अन्यायाविरोधात लढा देणाऱ्या कोमरम भीम यांची २२ ऑक्टोबरला जयंती झाल्याच्या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या योगदानाला उजाळा दिला. तसंच १५ नोव्हेंबरच्या आदिवासी गौरव दिनानिमित्त भगवान बिरसा मुंडा यांनाही त्यांनी आदरांजली वाहिली.

भारतीय वंशाचे श्वान आजूबाजूच्या परिस्थितीशी सहजपणे जुळवून घेणारे असतात, त्यामुळे, यापूर्वी देशवासीयांना आणि सशस्त्र दलांना भारतीय जातीचे श्वान पाळायचं आवाहन केल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी करून दिलं. त्याला प्रतिसाद देत सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलानं पथकांमध्ये भारतीय वंशाच्या श्वानांची संख्या वाढवल्याची माहिती त्यांनी दिली, तसंच सीमा सुरक्षा दलानं श्वानांना भारतीय नावं द्यायची परंपरा सुरू केल्याचंही त्यांनी सांगितलं. यादृष्टीनंच महाराष्ट्र आणि कर्नाटकातल्या मुधोळ

हाउंड, आणि उत्तर प्रदेशातल्या रामपूर हाउंड या जातीच्या श्वानांना प्रशिक्षण देत असल्याची माहिती त्यांनी 'मन की बात'मधून दिली.

**<><><><><>**

नीरा देवधर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या लोकार्पणासह फलटण इथल्या विविध विकास कामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते आज झालं. या प्रकल्पामुळे फलटण आणि माळशिरसला पाणी मिळणार असून हरित माणदेश निर्माण करणं हे सरकारचं उद्दिष्ट आहे, असं प्रतिपादन फडनवीस यांनी यावेळी केलं. माळशिरस तालुक्यातल्या बावीस गावांना पाणी पोहोचवलं जाईल, दुष्काळी भागाला पाणी पोहोचवणं हे सरकारचं ध्येय आहे, असं त्यांनी सांगितलं. विरोधकांच्या कार्यकाळात या प्रकल्पाचं काम अडवण्यात आलं होतं, त्यामुळे इतकी वर्षं हा भाग दुष्काळी राहिला अशी टीका त्यांनी केली.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्येबद्दल दुःख व्यक्त केलं, तसंच त्यांच्या आत्महत्येला जबाबदार असणाऱ्यांना शिक्षा होईल असं आश्वासन दिलं. या प्रकरणात काही जणांनी राजकारण करत माजी खासदार रणजीत नाईक निंबाळकर आणि आमदार सचिन पाटील यांचं नाव गोवण्याचा प्रयत्न केला, मात्र असं असतं तर आपण या कार्यक्रमाला आलो नसतो असं सांगत मुख्यमंत्र्यांनी निंबाळकर आणि कांबळे यांच्यावरचे आरोप फेटाळून लावले.

**<><><><><>**

साताऱ्याच्या फलटण उपजिल्हा रुग्णालयातल्या डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी त्यांच्या कुटुंबीयांची बीड मधल्या कवडगाव इथं भेट घेतली आणि त्यांचं सांत्वन केलं. डॉ. संपदा यांचा मृत्यू वेदनादायी असून, त्यांना न्याय मिळवून देऊ, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही पाठपुरावा करू असं आश्वासन त्यांनी दिलं.

स्थानिक आमदार सुरेश धस यांनीही डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. या प्रकरणाच्या तपासासाठी भारतीय पोलीस सेवेतल्या महिला अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करावं अशी विनंती मुख्यमंत्र्यांकडे करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, या प्रकरणातल्या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी डॉ. संपदा मुंडे यांच्या वडिलांनी केली आहे.

<><><><><>

सणासुदीच्या दिवसांमध्ये प्रवाशांच्या सोयीसाठी चालवण्यात आलेल्या विशेष रेल्वेगाड्यांचा लाभ आत्तापर्यंत दीड कोटीपेक्षा जास्त नागरिकांनी घेतला आहे. उत्सवांचा हा काळ संपेपर्यंत हा आकडा अडीच कोटीपेक्षा वर जाईल, अशी अपेक्षा असल्याचं रेल्वे मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. रेल्वेच्या पायाभूत सुविधांमध्ये गेल्या काही वर्षांत मोठी गुंतवणूक झाली असून विशेष गाड्यांची संख्याही विक्रमी झाली आहे, असं मंत्रालयानं नमूद केलं आहे.

<><><><><>

ज्येष्ठ अभिनेता सतीश शाह यांच्या पार्थिवावर आज मुंबईतल्या पवनहंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. चित्रपट आणि दूरचित्रवाणी विश्वातले अनेक कलाकार यावेळी उपस्थित होते. 'जाने भी दो यारो', 'मैं हूं ना', 'ओम शांती ओम' यासारख्या अनेक लोकप्रिय चित्रपटांमधल्या भूमिका गाजवणारे अभिनेता सतीश शाह यांचं काल मुंबईत निधन झालं होतं. 'साराभाई वर्सेस साराभाई' या मालिकेत त्यांनी साकारलेली इंद्रवदन साराभाई ही भूमिका प्रचंड लोकप्रिय झाली.

<><><><><>

मुंबईमधे कांदिवली भागात एका रहिवासी इमारतीला आज सकाळी आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांना आग आटोक्यात आणण्यात यश आलं. आगीमुळे गुदमरलेल्या एकंदर आठ नागरिकांना सुरक्षित बाहेर काढून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं. यातल्या पाच जणांना उपचारानंतर घरी सोडण्यात आलं असून तिघांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती स्थिर आहे.

<><><><><>

आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या सामन्यावर पावसाचं सावट आहे. नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील मैदानावर होणाऱ्या या सामन्याची नाणेफेक पावसामुळे पुढे ढकलण्यात आली आहे.

या स्पर्धेत आत्तापर्यंत भारतानं एकंदर सहा सामन्यांपैकी तीन सामने जिंकले आहेत, तर तीन सामन्यांमध्ये भारताला पराभवाचा सामना करावा लागला. भारत ६ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या क्रमांकावर आहे. तर बांगलादेशनं ६ सामन्यांपैकी फक्त एक सामना जिंकला असून त्यांचा संघ गुणतालिकेत शेवटच्या स्थानावर आहे.

<><><><><>

राज्याच्या काही भागात आलेल्या पावसानं अनेक ठिकाणी शेतीमालाचं मोठं नुकसान झालं. राजधानी **मुंबईत** आज सकाळपासून अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी कोसळत आहेत. **नाशिक** शहरासह जिल्ह्याच्या काही भागांमध्ये काल संध्याकाळनंतर मुसळधार पाऊस झाला तर शहर परिसरात हलका पाऊस पडला. बागलाण, दिंडोरी, कळवण, मनमाड, चांदवड या सर्व तालुक्यांमध्ये पावसानं जोरदार हजेरी लावली. यामुळं कांदा, कांदा बियाणं, मका, हरभरा आणि डाळिंब बागांचं मोठं नुकसान झालं. **गोंदियातही** पावसानं धान पिकाला मोठा फटका बसला. **धुळे** जिल्ह्यात आज पहाटे पुन्हा जोरदार पाऊस झाला

राज्याच्या बहुतांश भागांत आज हवामान विभागानं यलो अलर्ट दिला आहे.

<><><><><>

अनंत भालेराव प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी दिला जाणारा अनंत भालेराव पुरस्कार यंदा ज्येष्ठ पत्रकार गोपाळ साक्रीकर, निळू दामले आणि अरविंद वैद्य यांना जाहीर झाला आहे. नऊ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर इथं निवृत्त न्यायमूर्ती सुनील देशमुख यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यात माहूर इथं आजपासून दोन दिवसीय राज्यस्तरीय पर्यावरण संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. निसर्ग आणि सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन घेण्यात येत आहे. यात पाणी समस्या, विषमुक्त शेती आणि गोसंवर्धन, वन्यजीव संवर्धनाचं वास्तव यासारख्या विषयांवर मान्यवरांची व्याख्यानं होणार आहेत.

//<><><><><>//